NAAC Accredited-2022
'B++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur
केगाव, सोलापूर-४१३२५५ महाराष्ट्र (भारत)
दुरध्वनी क्र.०२१७-२७४४७७१-७३ (११ लाईन्स) फॅक्स-०२१७-२३५१३००
संकेतस्थळ: http://sus.ac.in ई-मेल: registrar@sus.ac.in / fao@sus.ac.in

**खरेदी व भांडार विभाग**

जा.क्र.पुअहोसोविसो/खभांवि/२०२६/5804 दिनांक: 24 JUN 2026

प्रति,

--------------------

**विषय: प्रस्तुत विद्यापीठातील आरोग्यकेंद्रास विविध औषधे खरेदी करण्यास वार्षिक दरकरार करण्याकरिता दरपत्रके मागविण्याबाबत...**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, प्रस्तुत विद्यापीठाच्या उपरोक्त नमूद विषयाप्रमाणे दरपत्रके मागविण्यात येत आहेत. दरपत्रके मागविण्याबाबत आपले अपेक्षित दर GST करासह खालील तपशीलाप्रमाणे दरपत्रकामध्ये भरून मा. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या नावे सिलबंद लिफाफ्यात पाठवावे. दरपत्रकासंदर्भात सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे. वरील कामाचे दरपत्रक, सुचना सोलापूर विद्यापीठाच्या *http://sus.ac.in* या संकेतस्थळावर (Quotation) या शिर्षकाखाली उपलब्ध आहे.

| List of Medicine Required for Health Center |
|---|
| **Medicine forms Required** |
| All forms Tablets, Capsules, Drops, Syrups, Ointments, Liniments, Lotion, Sprays, Powders, Granules, Sachets, Vapocaps, Liquids, IV Fluids, Oral Paster, Injection, Vials, Ampoules, Suppositories, Lozenges Etc. |

ठेक्याची मुदत कमी अथवा जास्त करण्याचा अधिकार विद्यापीठाने राखून ठेवला आहे. या बाबतीत मा.कुलगुरु जे निर्णय घेतील ते संबधित ठेकेदारावर बंधनकारक राहील. या ठेक्याची मुदत करारातील अटी व शर्ती कायम ठेऊन गरजेनुसार विद्यापीठ आणि ठेकेदार यांच्या संमतीने वाढविली जाऊ शकेल.

| अ.क्र | तपशील | दिनांक | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| १ | दरपत्रक प्रकाशित दिनांक व वेळ | २४/०६/२०२६ | | कुलसचिव कार्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर, सोलापूर-पुणे महामार्ग केगांव, सोलापूर-४१३२५५ |
| २ | दरपत्रक स्विकारण्याची दिनांक व वेळ | २४/०६/२०२६ | | |
| ३ | दरपत्रक सादर करणे अंतिम दिनांक व वेळ | ०२/०७/२०२६ | सायं ६.०० | |
| ४ | दरपत्रक उघडण्याचा दिनांक व वेळ शक्य झाल्यास) | ०३/०७/२०२६ | दुपारी ३.०० | |

(डॉ. अतुल लकडे)
**प्र-कुलसचिव**

## <u>सुचना व अटी</u>

१. दरपत्रक हे सिलबंद पाकिटातून कार्यालयीन वेळेत मा. कुलसचिव, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर-पुणे महामार्ग केगांव, सोलापूर-४१३ २५५ यांच्या नावाने विहित मुदतीत पोहोचतील अशा बेताने पाठवावीत.
२. दरपत्रकाच्या पाकीटावरती ***प्रस्तुत विद्यापीठातील आरोग्यकेंद्रास विविध औषधे खरेदी करण्यास वार्षिक दरकरार करण्याकरिता दरपत्रक*** असा स्पष्ट उल्लेख करावा.
३. SCHEDULE-B मधील Specification प्रमाणे पुरवठा करणे आवश्यक आहे.
४. दरपत्रकामध्ये खाडाखोड किंवा व्हायटनर चा वापर केल्यास दरपत्रक रद्द करण्यात येईल.
५. महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (शॉप ॲक्ट लायसन्स) मध्ये नमूद केलेल्या व्यवसायाचा संबंधित खरेदी किंवा कामाशी संबध असणे आवश्यक आहे. (संबधित साहित्य खरेदी व कामाचा अनुभव प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहिल.)
६. शॉप ॲक्ट लायसन्स, पॅन कार्ड, GST Registration, यांच्या छायांकित प्रती जोडणे बंधनकारक राहील. तसेच नियमानुसार GST Registration प्रमाणपत्र नसल्यास तसे हमीपत्र फर्मच्या लेटरहेडवर तयार करुन जोडावे.
७. दिलेल्या मुदतीनंतर म्हणजेच उशिरा आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही. तसेच अटी व शर्ती अपूर्ण असलेली दरपत्रके मंजूर करण्यात येणार नाहीत.
८. दरपत्रके हे देताना आपले दर सर्व करासहित (Including GST किंवा Excluding GST) किंमत असा स्पष्ट उल्लेख करावा. सदर साहित्य हे विद्यापीठात आवश्यकते प्रमाणे स्व:खर्चाने पुरवठा करणे व सेवा देणे बंधनकारक राहील.
९. फर्मने दिलेले दर हे अंतिम राहतील त्यामध्ये कोणतीही वाढ केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
१०. न्युनतम दर असलेल्या फर्मला कार्यारंभ/पुरवठा आदेश दिल्यानंतर विहित मुदतीत काम न केल्यास संबंधित फर्मवर नियमानुसार कारवाई करण्यात येईल.
११. कार्यारंभ/पुरवठा आदेशाप्रमाणे साहित्य प्राप्त झाल्याची खात्री झाल्यानंतरच प्रचलीत कराची कपात करून देयक आदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.
१२. पुरवठा करण्यात येणा-या साहित्याचा दर्जा उत्तम असावा.
१३. कोणतेही कारण न देता दरपत्रके स्विकारणे अथवा नाकारणे किंवा कोणत्याही टप्प्यावर प्रक्रिया रद्द करण्याबाबत विद्यापीठाने अधिकार राखून ठेवलेले आहेत. तसेच पुरवठा आदेशानुसार साहित्य नसेल तर पुरवठादाराचा ठेका रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.
१४. वरील दरपत्रकासंदर्भात काही शंका/अडचण असल्यास विद्यापीठाच्या ०२१७-२७४४७७०-७४ (Ext.१७१, १८९) या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
१५. पुरवठा आदेशातील सर्व अटी व शर्ती माझ्यावर बंधनकारक राहतील.
१६. सदर सुचना व अटी मान्य असल्याची स्वाक्षरी व शिक्का असलेले दरपत्रक तसेच सोबत जोडलेले हमीपत्र (Declaration) भरुन स्वाक्षरी व शिक्कासह जोडणे बंधनकारक असेल त्या शिवाय दरपत्रकाचा स्विकार केला जाणार नही. याची नोंद घ्यावी.
१७. वरील सुचना व अटी मान्य आहेत.

**पुरवठादाराची स्वाक्षरी व शिक्का**

## DECLARATION

I ______________________________________________ hereby Declare that, our firm _________________________________ is not Black listed, debarred or prohibited by Government of India or any other Government, Union Authority or Organization or University. I further declare that, no case/s, criminal or Civil or Enquires of any kind are pending or settled between our firm and Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University before judicial and quasi-judicial authority. If any civil and criminal case is found pending against university is right to action against us.

**Name of the Bidder/**
**Firm, Seal & Signature**